13 OCT 2017 लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## सुधीर गव्हाणे : शिवाजी विद्यापीठातील वृत्तपत्रविद्या विभागातर्फे कार्यशाळा

# बालहक्कांकडे मानवतेने पहा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** बाल हक्कांच्या प्रश्नांकडे मानवतेच्या दृष्टिकोनातून पाहणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन पुणे येथील 'एमआयटी'चे अधिष्ठाता डॉ. सुधीर गव्हाणे यांनी गुरुवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठातील वृत्तपत्र विद्या व संवाद शास्त्र विभाग, एम. ए. मास कम्युनिकेशन आणि युनिसेफतर्फे आयोजित राज्यस्तरीय कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी 'युनिसेफ'च्या महाराष्ट्राच्या प्रमुख संवादतज्ज्ञ स्वाती मोहपात्रा प्रमुख उपस्थित होत्या. या कार्यशाळेचा विषय 'शाश्वत विकासाच्या उद्दिष्टांचे मोड्युल' आहे.

डॉ. गव्हाणे म्हणाले, भारतासारख्या देशात शाश्वत विकासाची उद्दिष्टे पूर्णत्वाला आणणे खूपच आवश्यक आहे. माध्यमांनी याकामी सकारात्मक दृष्टिकोन स्वीकारला, तर निश्चितपणे शाश्वत विकासाची उद्दिष्ट गाठणे शक्य होणार आहे. स्वाती मोहपात्रा म्हणाल्या, शाश्वत विकासाचे अनेक निकष आहेत. त्यामध्ये बालकांचा विकास, त्यांचे हक्क आणि अधिकार याला विशेष महत्त्व आहे. माध्यमांनी या विषयाकडे सकात्मक दृष्टीने पाहिले तर चित्र बदलू शकेल. या कार्यक्रमाच्या प्रारंभी ज्येष्ठ पत्रकार अरुण साधू यांना आदरांजली वाहण्यात आली. त्यानंतर शिवाजी विद्यापीठातील वृत्तपत्र विद्या व संवादशास्त्र विभागप्रमुख डॉ. नीशा मुडे-पवार यांनी प्रास्ताविक केले. राज्यातील सर्व विद्यापीठांतील पत्रकारिता अभ्यासक्रमाचे प्रमुख प्रथमच एकत्र येत असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

'युनिसेफ'चे संशोधक डॉ. मनिंदरसिंग सेठिया यांनी शाश्वत विकासाच्या उद्दिष्ट्यांच्या मोड्यूलचे सादरीकरण केले.



कोल्हापुरातील शिवाजी विद्यापीठात गुरुवारी राज्यस्तरीय कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी 'एमआयटी'चे अधिष्ठाता डॉ. सुधीर गव्हाणे यांनी मार्गदर्शन केले.

### पत्रकारिता अभ्यासक्रमाच्या प्रमुखांचा सहभाग

या कार्यशाळेत डॉ. शाहीद शेख (रफिक झकेरिया सेंटर, औरंगाबाद), रवींद्र चिंचोलकर (सोलापूर विद्यापीठ), दीपक शिंदे (स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ), टी. व्ही. दौड (उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ), अनिलकुमार राय (महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय विद्यापीठ, वर्धा), मीरा देसाई (एसएनडीटी विद्यापीठ, मुंबई), कृष्णमूर्ती ठाकूर (एमआयटी आयएसबीजे), संजय तांबट, माधवी रेड्डी (पुणे विद्यापीठ), डॉ. रत्नाकर पंडित, डॉ. शिवाजी जाधव, डॉ. सुमेधा साळुंखे (शिवाजी विद्यापीठ), 'युनिसेफ'चे राज्यातील संवादतज्ज्ञ तानाजी पाटील, चंद्रशेखर वानखेडे, ज्येष्ठ पत्रकार दशरथ पारेकर, गोविंद गोडबोले सहभागी झाले आहेत.

जनसंपर्क कक्ष
13 OCT 2017 पुण्यनगरी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# बालहक्कांकडे मानवतेच्या दृष्टिकोनातून पाहणे गरजेचे

## डॉ. गव्हाणे : शाश्वत विकासाच्या मोड्यूलवर कार्यशाळा

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

बालहक्कांच्या प्रश्नाकडे मानवतेच्या दृष्टिकोनातून पाहणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन पुणे येथील एमआयटीचे अधिष्ठाता डॉ. सुधीर गव्हाणे यांनी केले. शिवाजी विद्यापीठाच्या वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र विभाग, एम. ए. मास कम्युनिकेशन आणि युनिसेफ यांच्या संयुक्त विद्यमाने 'शाश्वत विकासाच्या उद्दिष्टांचे मोड्यूल' या विषयावर आयोजित राज्यस्तरीय कार्यशाळेत ते बोलत होते. युनिसेफच्या महाराष्ट्राच्या प्रमुख संवादतज्ज्ञ स्वाती मोहपात्रा यांची यावेळी विशेष उपस्थिती होती.

प्रारंभी ज्येष्ठ पत्रकार अरुण साधू यांना आदरांजली वाहण्यात आली. पाहुण्यांचे स्वागत विभागप्रमुख डॉ. निशा मुडे-पवार यांनी केले.

डॉ. गव्हाणे म्हणाले, भारतासारख्या देशात शाश्वत-विकासाची उद्दिष्टे पूर्णत्वाला आणणे खूपच आवश्यक आहे. आरोग्यासारख्या अत्यंत संवेदनशील विषयात आपण जगाच्या खूप मागे आहोत. बालकांचे प्रश्न, गरोदर मातांचे प्रश्न, आहार यासह अनेक गोष्टींवर विशेष लक्ष केंद्रित करणे आवश्यक आहे. माध्यमांनीही याकामी सकारात्मक दृष्टिकोन स्वीकारला तर निश्चितपणे शाश्वत विकासाची उद्दिष्ट गाठणे शक्य होणार आहे.

स्वाती मोहपात्रा म्हणाल्या, शाश्वत विकासाचे अनेक निकष आहेत. त्यामध्ये बालकांचा विकास, त्यांचे हक्क आणि अधिकार याला विशेष महत्त्व आहे. जागतिक पातळीवर याविषयी काम सुरू आहे. माध्यमांनी या अत्यंत जिव्हाळ्याच्या विषयाकडे सकारात्मक दृष्टीने पाहिले तर चित्र बदलू शकेल.

युनिसेफचे संशोधक डॉ. मनिंदरसिंग सेठिया यांनी शाश्वत विकासाच्या उद्दिष्टांच्या मोड्यूलचे सविस्तर सादरीकरण केले. औरंगाबाद येथील रफिक झकेरिया सेंटरचे प्रमुख डॉ. शाहीद शेख, सोलापूर विद्यापीठ पत्रकारिता विभागप्रमुख डॉ. रवींद्र चिंचोलकर, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ पत्रकारिता विभागप्रमुख प्रा. डॉ. दीपक शिंदे, जळगाव येथील उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ पत्रकारिता विभागप्रमुख डॉ. टी. व्ही. दौड, वर्धा येथील महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय विद्यापीठ पत्रकारिता विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. अनिलकुमार राय, मुंबईच्या एसएनडीटी विद्यापीठ पत्रकारिता विभागप्रमुख डॉ. मीरा देसाई, एमआयटी आयएसबीजेचे संचालक डॉ. कृष्णमूर्ती ठाकूर, पुणे विद्यापीठ पत्रकारिता विभागप्रमुख डॉ. संजय तांबट, पुणे विद्यापीठ मीडिया स्टडीज़च्या प्रमुख डॉ. माधवी रेड्डी, युनिसेफचे संवादतज्ज्ञ तानाजी पाटील, डॉ. रत्नाकर पंडित आदी सहभागी झाले होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 OCT 2017
लोकमत

# मतदानासाठी १४,१७२ 'नोंदणीकृत पदवीधर' पात्र

## अंतिम यादी प्रसिद्ध; अधिकार मंडळ निवडणूक

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील विविध अधिकार मंडळांच्या निवडणुकीसाठीची नोंदणीकृत पदवीधर, विद्यापीठ शिक्षक, महाविद्यालयीन शिक्षक, विभागप्रमुख, आदी गटांची अंतिम मतदार यादी गुरुवारी सायंकाळी प्रसिद्ध झाली. यात नोंदणीकृत पदवीधर गटातून मतदानासाठी १४ हजार १७२ जण पात्र ठरले आहेत, अशी माहिती कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी दिली.

सप्टेंबरच्या दुसऱ्या आठवड्यात या निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला आणि तात्पुरती मतदार यादी प्रसिद्ध केली. या मतदार यादीस दुरुस्ती सुचविण्यांतर्गत ३९ जणांनी अर्ज केले होते. संबंधित अर्जांनुसार दुरुस्तीची प्रक्रिया पूर्ण करुन गुरुवारी सायंकाळी अंतिम मतदार यादी प्रसिद्धी केली. निवडणुकीची नोटीस दि. २२ रोजी जाहीर होईल. विद्यापीठाने कोल्हापूर, सांगली व सातारा जिल्ह्यांत निश्चित केलेल्या केंद्रांवर दि. १७ नोव्हेंबरला सकाळी नऊ ते सायंकाळी पाच या वेळेत मतदान होणार आहे. मतमोजणी, निकाल दि. २० नोव्हेंबरला होणार आहे.



### गटनिहाय पात्र मतदार

- विद्यापीठ शिक्षक : १९७
- महाविद्यालयीन शिक्षक : ३३७०
- विद्यापीठातील अधिविभागप्रमुख : ८७७
- प्राचार्य, संचालक : १३४
- संस्थाचालक, प्रतिनिधी : १२७

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 OCT 2017
तरुण भारत

# अधिकार मंडळ निवडणुकीच्या मतदारांची अंतिम यादी जाहीर

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठातील विविध अधिकार मंडळाची निवडणूक १७ नोव्हेंबर रोजी होणार आहे. मतदार अर्जांच्या छाननीनंतर प्राप्त तक्रारींच्या दुरुस्तीसह गुरुवारी मतदार यादी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर जाहीर करण्यात आली. पदवीधर, महाविद्यालय व अधिविभाग प्राध्यापक, प्राचार्य, व्यवस्थापन सदस्य, विभागप्रमुख असे एकूण १८ हजार ८७७ मतदार आहेत. विद्यापीठ निवडणुकीचा पहिला टप्पा पार पडल्याने विद्यापीठ प्रशासन आणि विविध संघटनांनाही दिलासा मिळाला. दरम्यान, २२ ऑक्टोबर रोजी निवडणुकीसंदर्भात सूचना जाहीर करण्यात येणार आहेत.

विद्यापीठ विविध अधिकार मंडळ निवडणुकीच्या मतदारांची अंतिम यादी जाहीर झाल्याने विद्यापीठ प्रशासनाने सुटकेचा निःश्वास सोडला. शिक्षक संघटना, संस्थाचालक, प्राचार्य असोसिएशन, सेवक संघ, अखिल भारतीय विद्यार्थी परिषद यांची विद्यापीठ विकास आघाडी आहे. ही आघाडी पालकमंत्र्यांच्या मार्गदर्शनाखाली; तर सुटा संघटना व शिवाजी विद्यापीठ आजी–माजी विद्यार्थी संघटना एकत्र येऊन निवडणूक लढवणार आहेत.



- ▶शिवाजी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध
- ▶विद्यापीठ निवडणूक एकूण मतदार १८ हजार ८७७
- ▶१७ नोव्हेंबरला मतदान, २० नोव्हेंबरला निकाल

**निवडणूक कार्यक्रम** : निवडणूक नोटीस तारीख : २२ ऑक्टोबर, उमेदवारी अर्ज भरण्याची अंतिम तारीख : २२ ते ३१ ऑक्टोबर सायं. ५ पर्यंत, अर्ज छाननी : २ नोव्हेंबर, अर्ज माघार : ४ नोव्हेंबर सायं. ५ पर्यंत, पात्र उमेदवारांची यादी : ६ नोव्हेंबर, मतदान : १७ नोव्हेंबर सकाळी ९ ते सायं. ५पर्यंत, मतमोजणी व निकाल : २० नोव्हेंबर

13 OCT 2017 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यापीठ निवडणूक रणधुमाळीस प्रारंभ

## अंतिम मतदार यादी प्रसिध्द

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाची अंतिम मतदार यादी गुरुवारी सायंकाळी अधिकृत संकेतस्थळावरून प्रसिद्ध करण्यात आली. मतदार यादी प्रसिद्ध झाल्यानंतर आता खऱ्या अर्थाने निवडणुकीच्या रणधुमाळीस प्रारंभ होणार आहे.

शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभा आणि विविध अधिकार मंडळाची निवडणूक १७ नोव्हेंबर २०१७ रोजी होणार आहे. आज निवडणुकीची अंतिम मतदार यादी प्रसिद्ध झाली. या मतदार यादीनुसार नोंदणीकृत पदवीधर मतदार संख्या-१४ हजार १७२, कॉलेज शिक्षक-३ हजार ३७०, विभागप्रमुख-८७७, संस्थाचालक-१२७, प्राचार्य-१३४ आणि विद्यापीठ शिक्षक-१९७असणार आहेत. निवडणुकीसंदर्भातील नोटीस २२ ऑक्टोबरला काढली जाणार आहे. तर उमेदवारी अर्ज भरण्याची अंतिम ३१ ऑक्टोबर असणार आहे. मतदान १७ नोव्हेंबरला तर मतमोजणी व निकाल २० नोव्हेंबरला जाहीर होणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
13 OCT 2017
सकाळ

# विवेकानंद महाविद्यालयाला सर्वाधिक पारितोषिके

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. १२ : शिवाजी विद्यापीठाच्या ३७ व्या मध्यवर्ती युवा महोत्सवात सांघिक कला प्रकारात विवेकानंद महाविद्यालयाने सर्वाधिक पारितोषिके प्राप्त करत विजेतेपदाची दशकपूर्ती केली.

आमदार सतेज पाटील व प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते पारितोषिके दिली. महाविद्यालयाने लोकनृत्य, लोकवाद्यवृंद, पाश्चिमात्य समूह गीत, भारतीय समूह गीत, वादविवाद व लघुनाटिकांत यश मिळवत सर्वसाधारण विजेतेपदाचा अभिजितदादा कदम फिरता चषक मिळविला.

विद्यार्थ्यांना कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, प्राचार्या शुभांगी गावडे, प्राचार्य डॉ. एस. वाय. होनगेकर यांचे प्रोत्साहन मिळाले.

डॉ. होनगेकर यांच्या मार्गदर्शनाखाली सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. डी. सी. कांबळे, डॉ. मंजुश्री घोरपडे, प्रा. बी. के. गोसावी, डॉ. ए. एस. महात, प्रा. श्रुती जोशी, प्रा. संदीप पाटील यांनी परिश्रम घेतले.